# किंमत

"त्याला/ तिला माझी किंमत नंतर कळेल," हे वाक्य अगदी प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी येतेच, तो किंवा ती मोठ्या उद्‌विग्नतेने हे वाक्य प्रकट करतातच, का होते असे? आपण एखाद्या व्यक्तिकरता खूप काही करत असतो, सुरुवातीला तो एक आधार म्हणून, प्रेम म्हणून, साथ म्हणून असते, त्या गोष्टींची सवय होत जाते, समोरचा तो किंवा ती त्याचा नकळत लाभ, आधार घेत राहतो, हा आधार भावनिक असेल, आर्थिक असेल, मानसिक असेल, पण मग कुठेतरी ते ग्राह्य धरले जाते.

एखाद्या क्षणी आधार असणाऱ्या त्याला किंवा तिला कुठेतरी अशीच वेगळ्या आधाराची गरज असते, सापेक्षतेने तो किंवा ती त्या समोरच्या तो किंवा तिच्याकडून, स्वतःहून काही मदत आपल्याला येते का याची प्रतीक्षा करू लागतो.

पण तसे होत नाही, मग घुसमट होते, विचारांचे गुंते होतात, क्वचित तिसऱ्या व्यक्तीला गाठून "तुला माहीतच आहे ना रे/गं मी किती मदत केली तुला माहीत आहे ना, आणि आता बघ माझ्या वेळेला हे असं होतं." ज्या आधाराची अथवा नात्याची चर्चा, कौतुक आणि अभिमान असतो, त्याचे दडपण वाटायला लागते, असे का होते?, कुणी तरी एक बाजू कमकुवत पडते, म्हणून अमूल्य वाटणाऱ्या नात्याची किंमत व्हायला चालू होते.

नकळत झाले असेल तर हा तिढा प्रसंगीच लगेच तुटतो करण दुसऱ्या व्यक्तीचे दुर्लक्ष झालेले असते, ते जाणीवपूर्वक केलेले नसते, आणि दोन्ही बाजूस त्या एकमेकांच्या साथीची उत्कटता आणि प्रामाणिकपणा हा खूप मोलाचा आहे हे ठाऊक असल्याने, ती वीण पुन्हा एकदा वागण्यातून घट्ट होते.

पण काही बेरके लोक हे अशा सात्विक, प्रामाणिक आणि निर्भेळ वृत्तीचा प्रचंड गैरवापर करून घेतात. समोरच्याने आपला/आपली मानले असल्याने खूप काळ दुर्लक्ष होते. समोरचा संपूर्ण वापर करत राहतो, पण कधीतरी हे ढोंग उघडे पडते, ते झाकायचा निष्फळ प्रयत्न केला जातो, पण सत्य हे अंतिम सत्यच असते. समोरचा माणूस आपण देऊ केलेल्या सात्विक साथीची अशी किंमत झालेली

पाहून उद्विग्न होतो, आणि त्याचा चांगुलपणावरील विश्वासच धक्का खातो. यात त्याची काहीच चूक नसते. समोरच्याने फक्त चांगला चेहरा ठेवून विश्वासघात केलेला असतो. ढोंग उघडे पडल्याने समोरच्याने दिलेली भंपक करणे आणि समजावण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड त्याचे मूल्य अधिकच कमी करून टाकते.

अशा विश्वासघातकी लोकांना शा निर्मळ नात्याची, प्रेमाची किंमत ही ते नाते/मैत्री दुरावल्यावरच जास्त कळते, आणि नशिबाने आपल्याला असा मित्र/मैत्रीण मिळाली, त्याने/तिने अमूक केले होते असा मनातच उहापोह चालू होतो.

फरक इतकाच, इतके दिवस ती किंमत स्वतःची होती, खिशात होती, आता फक्त ती चुकवायला लागली एका घट्ट, उमद्या, हक्काच्या नाते गमावल्याच्या बदल्यात...

म्हणून आपल्याला लाभलेले नाते/मैत्री जितके जास्त जपता येईल तितके जपावे, समोरच्याने त्याची किंमत काढण्याची वेळ येऊ देऊ नये.

**सचिन कुलकर्णी**

© सपु, www.saarthbodh.com

(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप २०२०')